**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः08.06.2025** **वारःरविवार**

---

- शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.

- राज्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी नदीजोड प्रकल्पाची आवश्यकता – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

- आषाढी वारीतील संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी प्रस्थान सोहळा यंदाच्या वर्षी रात्री आठ वाजता होणार.

आणि

- राज्यात यंदा खरीप हंगामापासून बियाणांचं वितरण आणि विक्री आता साथी पोर्टलवर.

**मोदीशेतकष्टकरी**

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात कष्टकरी शेतकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळाली, हे सरकारचं भाग्य असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या ११ वर्षांत, विविध सरकारी उपक्रमांमुळे शेतकऱ्यांची समृद्धी वाढली असून, कृषी क्षेत्रात परिवर्तन घडून आलं. तसंच मातीचं आरोग्य आणि सिंचन यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे त्याचे चांगले परिणाम दिसत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आगामी काळातही शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकारचे प्रयत्न सुरु राहतील असं आश्वासन पंतप्रधानांनी यावेळी दिलं.

**वॉका-11वर्षे-मध्यमवर्ग**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांमुळे भारतानं गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज गेल्या ११ वर्षात प्रमुख क्षेत्रांमध्ये सरकारनं केलेल्या प्रयत्नांवर एक विशेष लेख तुमच्यासाठी घेऊन येत आहे. यामध्ये आज, राहणीमानाची सुलभता हा विषय आहे - सुधारणा आणि उपक्रमांमुळे प्रत्येक नागरिकाचं दैनंदिन जीवन सोपं, अधिक सुरक्षित आणि अधिक सन्माननीय बनलं आहे, त्यावर आधारित हा वृत्तांत, माझे सहकारी मनोज क्षीरसागर यांच्याकडून...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

गेल्या दशकात मध्यमवर्गीयांचं दैनंदिन जीवन सुधारणं हा प्रशासनाचा केंद्रबिंदू राहिला आहे. गृहनिर्माण आणि आरोग्यसेवेपासून ते शहरी गतिशीलता आणि डिजिटल सुविधांपर्यंत, सरकारनं मध्यमवर्गाचं जीवन सोपं, अधिक सुरक्षित आणि अधिक सोयीस्कर बनवण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत, १ कोटी १६ लाखांहून अधिक घरं मंजूर करण्यात आली आहेत, यातील ९३ लाख घरं आधीच पूर्ण झाली आहेत किंवा हस्तांतरित करण्यात आली आहेत. स्मार्ट सिटीज मिशनने ७ हजार ५४५ मंजूर प्रकल्पांपैकी ९३ टक्क्यांहून अधिक प्रकल्प पूर्ण करून पायाभूत सुविधांमध्ये बदल घडवून आणला आहे.मेट्रो नेटवर्क एका दशकात चौपट झाले आहे, २०१४ मध्ये हा मार्ग २४८ किलोमीटर होता, २०२५ मध्ये मेट्रो एक हजार किलोमीटरहून अधिक मार्गावर धावते आहे. उडान योजनेखाली सामान्य लोकांसाठी विमान प्रवास परवडणारा आणि सुलभ बनवला आहे, ८८ विमानतळ ६२५ मार्गांनी जोडले आहेत.प्रधानमंत्री जन आरोग्य योजना जगातील सर्वात मोठ्या सार्वजनिक निधीतून चालणाऱ्या आरोग्य विमा योजनांपैकी एक म्हणून उदयास आली आहे - ४१ कोटींहून अधिक आयुष्मान कार्ड जारी केले आहेत. जन औषधी केंद्रांची संख्या आता १६ हजारांहून अधिक आहे, दर्जेदार औषधं ८० टक्क्यांपर्यंत स्वस्त झाली आहेत आणि जीवनावश्यक औषधं सामान्य नागरिकांच्या आवाक्यात आली आहेत. डिजीलॉकरसारख्या मंचामुळे कागदपत्रांच्या भौतिक प्रती बाळगण्याची किंवा सादर करण्याची गरज कमी झाली आहे. ५२ कोटींहून अधिक वापरकर्त्यांनी यावर साइन अप केलं आहे, यातून या सेवेची उपयुक्तता अधोरेखित होते. ८ कोटींहून अधिक वापरकर्त्यांसह उमंग ॲप २०० हून अधिक विभागांकडून एकाच ठिकाणी सेवा देतं. आता १४१ कोटींहून अधिक नागरिकांना आधार सेवा प्रदान करत आहे, कल्याणकारी वितरण सुलभ तर आर्थिक गळती कमी करत आहे. एकत्रितपणे, हे उपक्रम भारतातील वाढत्या मध्यमवर्गाचं जीवन अभिमानास्पद, सोयींनी युक्त आणि आत्मविश्वासपूर्ण राहील याची खात्री करतात.

**<u>पाणीपरिषद</u>**

राज्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठ्या धरणासमवेत नदीजोड प्रकल्प, जलसंधारण, जलपूनर्भरण, पाण्याचा पूनर्वापर आणि इतर लहान मोठ्या प्रकल्पाची जोड देणे आवश्यक असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जनकल्याणकारी समिती नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विदर्भ पाणी परिषदेच्या उद्घाटन समारंभात काल बोलत होते. पश्चिमी वाहिनीतील नद्यांचे  समुद्रात वाहून जाणाऱ्या पाण्यापैकी 54 टी.एम.सी. पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्याचा निश्चय केला असून नळगंगा-वैनगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे विदर्भातील अर्वषणग्रस्त भागात पाणी आणत आहोत तसच तापी खोऱ्यातील 35 टी.एम.सी. पाणी तापी खोऱ्यातच राहील, असे नियोजन केलं असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

**<u>पाप्रस्थान</u>**

आषाढी वारीतील संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी प्रस्थान सोहळा यंदाच्या वर्षी रात्री आठ वाजता होणार आहे. यंदा गुरुवार आल्यामुळं परंपरेप्रमाणं नित्य गुरुवारची माउलींच्या पालखीची मंदिर प्रदक्षिणा आणि आरती झाल्यानंतर पालखीचं प्रस्थान होणार असल्याची माहिती पालखी सोहळा प्रमुख डॉक्टर भावार्थ देखणे यांनी दिली आहे. २० जूनला पालखी सोहळा पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे.

**<u>इंट्रो-VC- साथी पोर्टल</u>**

राज्यात यंदा  खरीप हंगामापासून सर्व प्रकारच्या बियाण्यांचे वितरण आणि विक्री साथी पोर्टलवर करण्याच्या सूचना कृषी विभागाकडून  दिल्या आहेत. केंद्र शासनाने संनियंत्रणासाठी साथी पोर्टल  विकसित केले आहे. यामध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे मिळून त्यांचे हित जोपासण्यास प्राधान्य देण्यात आले आहे तसेच बियाणे व्यवसायातील गैरप्रकारांना आळा घालण्यासही मदत होणार असल्याचे पुणे  कृषी आयुक्तालयातून सांगण्यात आले. ऐकुयात अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून. . . . . .

**<u>Vc</u>**

स्क्रिप्ट : परराज्यांत उत्पादित झालेले परंतु महाराष्ट्रात विक्री होणाऱ्या बियाण्यांसाठीसुद्धा साथी पोर्टल अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व बियाणे उत्पादक आणि विक्रेत्यांची नोंदणी साथी पोर्टलवर करण्यात येणार

आहे.कृषी विभागाचे अधिकारी तसेच क्षेत्रीय कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन केले जात आहे. शेतकऱ्यांनी बियाणे विक्रेत्यांकडून साथी प्रणालीवरूनच बियाणे खरेदी करण्याबाबत गावपातळीवर व्यापक प्रसिद्धी देऊन जनजागृती केली जात आहे. या पोर्टलमुळे समन्वय वाढून डिजिटल प्रणालीमुळे सर्व संबंधित घटक एका प्लॅटफॉर्मवर आले असून व्यवस्थापनही सोपे झाले आहे. सध्या साथी पोर्टलवर 986 बियाणे उत्पादक कंपन्या, 209 बीज प्रक्रिया केंद्रे आणि 74 हजार 366 बियाणे विक्रेत्यांची नोंदणी झाली आहे. साथी पोर्टलची अंमलबजावणी दोन टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यामध्ये पहिला टप्पा पायाभूत आणि प्रमाणित बीजोत्पादन तर दुसरा टप्पा उत्पादित बियाण्यांचे वितरण आणि विक्रीस प्राधान्य देण्यात आले आहे. साथी प्रणालीमुळे बियाणे उद्योगात पारदर्शकता निर्माण होणार आहे. असे पुणे कृषी संचालक सुनील बोरकर यांनी सांगितले. आकाशवाणी बातम्यांसाठी भूषण राजगुरू , पुणे.

**<u>महिलामुख्यमंत्री</u>**

महिला सक्षमीकरणात शिक्षण हा अत्यंत मोलाचा घटक असून यासाठी मुलींना प्रोत्साहित करणाऱ्या अनेक योजना राज्य शासनातर्फे राबविण्यात येत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. काल नागपूर इथं आरबीएलच्या उम्मीद उपक्रमाअंतर्गत गरजू विद्यार्थिनींना सायकल आणि शालेय साहित्याचे वितरण फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. तसेच धन्वंतरी आरोग्य शिबिराचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.

**<u>रागांमतदार</u>**

काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीमध्ये वाढलेल्या मतदार संख्येबाबत नेहमी कुठल्याही तथ्याशिवाय खोटे बोलून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करत आहेत असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपुरात बातमीदारांशी बोलताना सांगितलं. राहुल गांधींनी बिहारमध्ये महाराष्ट्रातील निवडणुकांबाबत वक्तव्य केले होतं त्या संदर्भात फडणवीस बोलत होते. याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगानं सप्रमाण स्पष्ट केलं असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

**<u>ईद</u>**

राज्यभरात काल ईद ऊल अजहा अर्थात बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. पुण्यात पुणे सोलापूर रस्त्यावरील ईदगाह मैदानात पावसाचा वर्षाव अंगावर झेलत सामुहिक नमाजचा आनंद घेतला. धुळे

जिल्ह्यात मानव कल्याणासाठी आणि विश्व बंधुत्वासाठी प्रार्थना करण्यात आली. वाशिम, बीड, जालना, कोल्हापूर आदि जिल्ह्यात ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या आणि सामूहिक नमाज पठण करण्यात आलं.

**कोरोना**

देशात काल कोरोना-पॉझिटीव रुग्णांची संख्या 5 हजार 3 शे 64 झाली. देशात 764 नवीन कोरोना रुग्ण आढळून आले असून 4 जणांचा मृत्यू झाला आहे. कोरोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर केंद्राने सर्व राज्यांना ऑक्सिजन, औषधे यांसह आवश्यक त्या गोष्टी उपलब्ध ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

**ट्रॉमासेंटर**

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला इथल्या पूर्ण झालेल्या ट्रॉमा सेंटर तत्काळ सुरू करावे अशा मागणीचे पत्र खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना दिलं आहे. हे ट्रॉमा सेंटर तातडीने कार्यान्वित करून परिसरातील नागरिकांना आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असं मोहिते-पाटील यांनी म्हटलं आहे.

**गोरेपालखी**

संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होणार नाही यासाठी प्रत्येक विभागानं सूक्ष्म नियोजन करावं अशा सूचना ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या आहेत. विविध पालखी तळांच्या पाहणी दरम्यान त्यांनी पोलीस यंत्रणेनं पालखी मार्गावर गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही आणि ड्रोन कॅमेऱ्यांचा उपयोग करावा असंही गोरे यांनी म्हटलं आहे.

**खिळे**

लातूर शहरातील मुख्य रस्त्यावर असणाऱ्या अनेक झाडांवर जाहिराती लावण्यासाठी शेकडो झाडांना खिळे मारण्यात आले आहेत. या झाडांना कायमस्वरूपी वेदनामुक्त करण्यासाठी लातूरच्या वसुंधरा प्रतिष्ठाननं जागतिक पर्यावरण दिनापासून खिळेमुक्त झाड अभियानाला पुन्हा सुरुवात केली आहे.

**<u>मुले</u>**

गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेला लागून तेलंगण राज्याच्या हद्दीतील गोदावरी नदीत आंघोळीसाठी उतरलेली सहा मुलं बुडाल्याची घटना काल संध्याकाळी घडली. ही सर्व मुलं तेलंगणची असून त्यांचा अद्याप शोध लागलेला नाही.

**<u>पाऊस</u>**

धुळे जिल्ह्यात काल वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने जोरदार तडाखा दिला आहे. सांगली जिल्ह्यातील मिरज, तासगाव, कवठे-महांकाळ, पलूस आणि वाळवा तालुक्यात जोरदार पाऊस पडला .

**<u>हवामान</u>**

राज्यात आज कोकण , मध्य महाराष्ट्र , मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**या बरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं ,नमस्कार.**